## संपादकीय

# जातनिहाय गणना ;नवे आव्हान

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यात जातनिहाय गणना करुन त्याचा अहवाल जाहीर करुन राजकारणात मोठी खेळी खेळली आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून जातनिहाय गणना झालीच नव्हती. दुर्बल घटकांना व मागास जातींना शैक्षणिक व नोकऱ्यांमध्ये आरक्षण देणे घटनेनेच बंधनकारक केले आहे. त्यासाठी मागास व दुर्बल जातीची लोकसंख्या किती आहे हे समजावे यासाठी जातनिहाय गणना करणे आवश्यक आहे, असा युक्तिवाद केला जात आहे. गेल्या पंचाहत्तर वर्षांत जातनिहाय गणना कोणत्याही पक्षाच्या केंद्र सरकारने केली नव्हती किंवा कोणत्याही राज्याने त्यासाठी पुढाकार घेतला नव्हता. १९९० मध्ये मंडल आयोगाच्या शिफारसी लागू झाल्यानंतर देशभर आरक्षणाच्या विरोधात संघर्ष उसळला, त्याचा परिणाम कोणत्याही सरकारने जातनिहाय गणना करण्याचे धाडस केले नव्हते. पण गेली चार, साडेचार दशके सत्तेच्या परिघात राहिलेल्या नितीश कुमार यांनी मोठ्या मुत्सद्दीपणाने राज्यातील सत्तेचा वापर करुन बिहारमध्ये जातनिहाय गणना राबवली व त्याचा अहवालही जाहीर केला.

आरक्षणाचा लाभ सुरुवातीपासून अनुसूचित जाती, जमातींचा मिळत होता. पण ओबीसींकडे दुर्लक्ष होत राहिले, असा मुद्दा मांडला जात आहे. शेकडो जाती व उपजातींचा ओबीसींमध्ये अद्याप समावेश झालेला नाही. बिहारमध्ये १९७७ मध्ये कर्पूरी ठाकूर मुख्यमंत्री असताना सामाजिक न्याय देण्यासाठी त्यांनी मुंगेरीलाल आयोगाने ओबीसींच्या संदर्भात केलेल्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला. नितीश कुमार यांच्या सरकारने केलेल्या जातनिहाय गणनेमुळे ओबीसींसह सर्व जातींची आकडेवारी बाहेर आली. कर्पूरी ठाकूर यांनी मुख्यमंत्रीपदाच्या दुसऱ्या टर्ममध्ये १९७८ मध्ये अति मागासवर्गीयांना १२ टक्के व मागासवर्गीयांना ८ टक्के आरक्षण देऊ केले.

जातनिहाय जनगणना करण्यास भाजप टाळाटाळ करते असा समज भाजपचे विरोधक निर्माण करीत आहेत. पण देशात सर्वत्र ओबीसी मतदारांनी गेली दहा वर्षे भाजपला भरभरुन मतदान केले आहे हे कसे विसरता येईल. विरोधी पक्ष जातनिहाय गणनेवरुन भाजपला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करीत आहे पण ओबीसी मतदारांचा विरोधी पक्षांपेक्षा भाजपवर जास्त विश्वास आहे हे २०१४ पासून प्रत्येक निवडणूक निकालाने दाखवून दिले आहे. समाजातील सवर्ण, ओबीसी हा भाजपचा मोठा मतदार आहे. सन २०१४ व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे खासदार बहुमताने निवडून आले. जवळपास तीन दशकांनंतर एका राजकीय पक्षाला लोकसभेत स्वबळावर बहुमत प्राप्त झाले. अर्थात याचे श्रेय नरेंद्र मोदी यांच्या करिष्माई नेतृत्वाला आणि अमितभाई शहा यांच्या संघटन कौशल्याला आहे.

बिहारमध्ये झालेली जातनिहाय गणना व त्याचा अहवाल नितीश कुमार यांच्या सरकारने जाहीर केल्यानंतर त्या अहवालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देण्यात आले आहे. जातनिहाय सर्वेक्षणात १३ कोटी ७ लाख, २५ हजार ३१० लोक सामील झाले. बिहारमधील जातनिहाय गणनेत हिंदू धर्मियांची संख्या ८२ टक्के आहे. त्यानंतर मुस्लीम लोकसंख्या १७.७० टक्के आहे. राज्यात जातनिहाय गणना करावी, असा बिहार विधानसभेने एकमताने ठराव संमत केला होता. गेल्या वर्षी ६ जून रोजी बिहार मंत्रिमंडळाने तसा निर्णय घेतला. जातनिहाय गणना करण्यासाठी ५०० कोटी रुपये खर्चाची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. मात्र जातीवर आधारित जनगणनेला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका पाटणा उच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. त्या सर्व याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या व त्यानंतर जातनिहाय गणनेचा मार्ग मोकळा झाला.

भाजपकडे ओबीसी मतदार मोठ्या संख्यने झुकला आहे म्हणून काँग्रेससह अनेक राजकीय पक्षांना ओबीसींचा अचानक कळवळा आला आहे. राहुल गांधी यांनी महिला आरक्षण विधेयकाला पाठिंबा देताना ओबीसींसाठी स्वतंत्र कोटा ठेवावा, अशी मागणी केली होती. बिहारचा जातनिहाय गणना अहवाल जाहीर होताच राहुल गांधी आता त्याच्या सभांमध्ये "जितनी आबादी, उतनी भागीदारी' अशी घोषणा करीत आहेत. लोकसभेत एकूण ५४३ खासदार आहेत. पैकी ४२.७ टक्के खुल्या वर्गातील आहेत, तर ओबीसी प्रवर्गातील केवळ २२ टक्के खासदार आहेत. देशात अनुसूचित जातींची लोकसंख्या १६.०६ टक्के आहे. पण लोकसभेत या वर्गाच्या खासदारांची संख्या १५.८३ टक्के आहे. अनुसूचित जमातीची लोकसंख्या ८.६ टक्के आहे. पण लोकसभेतील या वर्गातील खासदारांची संख्या ९.५७ टक्के आहे. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी १७ मार्च २०२२ रोजी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारी नोकऱ्यांमध्ये खुल्यावर्गातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण ग्रुप १ मध्ये ६१ टक्के व ग्रुप २ मध्ये ५२ टक्के असल्याचे मान्य केले आहे. अधिकारी वर्गात ग्रुप ए मध्ये खुल्यावर्गात असलेल्यांचे प्रमाण ६४.५ टक्के आहे, तर ओबसी १६.८ टक्के, एससी- १२.०८ टक्के, तर एसटी ८. ६ टक्के अधिकारी म्हणून केंद्रीय नोकरीत आहेत.

बिहारमध्ये झालेल्या जातनिहाय गणनेत यादवांची संख्या मोठी आहे. यादव १४.२६ टक्के आहेत. मुस्लिमांची १७.७ टक्के लोकसंख्या आहे. मुस्लीम-यादव मिळून (एमवाय) व्होट बँक ३२ टक्के आहे. ओबीसींमधील कोइर व कुर्मी हे मतदार नितीश कुमार यांच्या पाठीशी उभे असतात. बिहारमध्ये कोइर ४.२१ टक्का आहेत, तर कुर्मी हे अवघे २.८७ टक्के आहेत. दोन्ही समाजाची मिळून ही लोकसंख्या ७ टक्के होते. बिहारमध्ये झालेल्या जातनिहाय गणनेत सवर्णांची लोकसंख्या १५.५२ टक्के असल्याचे आढळले. त्यात ब्राह्मण ३.६७ टक्के, राजपूत ३.४५ टक्के आणि भूमिहार २.८९ टक्के आहेत.

बिहारमधील जातनिहाय गणनेचे मॉडेल म्हणजे भाजप विरोधकांना एक राजकीय हत्यार प्राप्त झाले आहे. सन २०१० मध्ये केंद्रात काँग्रेसप्रणीत यूपीएचे सरकार होते. तेव्हा डॉ. मनमोहन सिंग सरकारने महिला आरक्षण विधेयक मांडले होते, पण त्यात ओबीसींसाठी स्वतंत्र कोट्याची तरतूद नव्हती. आता त्याबद्दल राहुल गांधी खेद व्यक्त करीत आहेत. भाजप विरोधकांना म्हणजे इंडिया नामक आघाडीला जातनिहाय गणना हा प्रचाराचा मुद्दा बनवायचा आहे, पण त्यावर किती मतदार आकर्षित होऊ शकतात, हे ठामपणे सांगता येत नाही. इंग्रजांच्या काळात जातनिहाय गणना होत असे. १८८१ मध्ये पहिल्यांदा इंग्रजांनी देशात जातनिहाय गणना केली. १९३१ पर्यंत ही प्रथा चालू होती. १९४१ मध्ये जनगणना झाली. पण त्याची आकडेवारी जाहीर झाली नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या वेळच्या प्रमुख नेत्यांनी जातनिहाय गणना करू नये असे ठरवले. स्वातंत्र्यानंतर १९५१ मध्ये जनगणना झाली पण त्यात जातनिहाय गणना केली गेली नाही. केवळ एसीसी, एसटी अशी गणना झाली. कारण त्यांना घटनेनुसार आरक्षण देणे बंधनकारक आहे. जातीच्या आधारावर आरक्षण मिळावे, अशी पहिली मागणी उत्तर प्रदेशातून काशीराम यांनी केली.

भारत सरकारने सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागास जातींना आरक्षण देण्यासाठी मंडल आयोगाची स्थापना केली. १९८० च्या दशकात जातीवर आधारित नोकऱ्या व शिक्षणात आरक्षण मिळावे या मागणीला जोर चढला. व्ही. पी. सिंग पंतप्रधान असताना त्यांनी मंडल आयोगाच्या शिफारसी स्वीकारल्याचे जाहीर केल्यानंतर देशात अनेक ठिकाणी विरोधाचा आगडोंब उसळला. सन २०१० मध्ये लालूप्रसाद यादव मुलायम सिंह यादव यांनी जातनिहाय गणना व्हावी म्हणून पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग सरकारवर बराच दबाव आणला होता.

यूपीए सरकारच्या काळात सामाजिक-आर्थिक जातनिहाय गणना करण्याचा प्रयोग झाला. २०१३ मध्ये काम पूर्ण झाले. पण त्याचा तपशील पुढे कधी आला नाही. मंडल आयोगाने दिलेल्या अहवालात ओबीसींचा आकडा ५२ टक्के आहे. पण तो २०११ च्या जनगणनेवर आधारित आहे. बिहार मॉडेलचे मोदी सरकार भविष्यात अनुकरण करेल की नाही हे गुलदस्त्यात आहे, पण बिगर भाजप राज्यांतून अशा मागणीला जोर चढू लागला आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमानुसार महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियमानुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील मुलां-मुलींना संस्थेत दाखल करण्याऐवजी पर्यायी कुटूंब उपलब्ध करुन देणे व संस्थेतील वातावरणाऐवजी कौटुंबिक वातावरणात त्यांचे संगोपन व विकास घडवून आणण्यासाठी राज्यात बालसंगोपन योजना सुरु करण्यात आली होती.

ही योजना संस्थाबाह्य योजना असून या योजनेअंतर्गत ० ते १८ वयोगटातील मुलामुलींना थेट पर्यायी कुटूंबात संगोपनाकरिता ठेवता येते. अनाथ, निराधार, निराश्रित, बेघर, दुर्धर आजारी पालकांची मुले, कैद्यांची मुले या योजनेचा लाभ घेतात राज्यामध्ये कोविडमुळे पालक मृत पावल्याने अनाथ झालेल्या बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या असंख्य असल्याने एकाच कुटुंबातील दोन पेक्षा जास्त बालकांना लाभ देण्याबाबत, दोन पेक्षा जास्त बालके एकाच कुटुंबात संगोपनासाठी देण्याबाबत तसेच कार्यरत स्वयंसेवी लाभार्थी संख्या वाढ, नवीन संस्थांना मान्यता व संस्था निवडीचे निकष, अनुदान वितरण पद्धती निश्चित करुन याबाबत यापूर्वीचे सर्व शासन निर्णय/परिपत्रक अधिक्रमित करुन बालसंगोपन योजनेचे नाव बदलून "क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना' राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

### बालसंगोपन योजनेसाठी पात्र लाभार्थी

अनाथ किंवा ज्यांच्या पालकांचा पत्ता लागत नाही व जी बालके दत्तक देणे शक्य नाही अशी बालके. एक पालक असलेली बालके, (एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट, पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे, इ. कारणांमुळे कुटुंब विघटीत झालेली, एक पालक असलेली बालके). कुटुंबातील तणाव, तंटे, वादविवाद, न्यायालयीन वाद अशा सारख्या कौटुंबिक संकटात बाधित बालके. कुष्ठरुग्ण पालकांची बालके, जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, तुरुंगात असलेल्या पालकांची बालके, एच.आय.व्ही. ग्रस्त पालकांची बालके, कॅन्सर सारख्या दुर्धर आजाराने बाधित पालकांची बालके. तीव्र मतीमंद बालके, एच. आय. व्ही. ग्रस्त किंवा कॅन्सरग्रस्त बालके, ४० टक्के पेक्षा अधिक अपंगत्व असलेली, अंध, दिव्यांग बालके, भिक्षा मागणारी बालके, पोक्सो अधिनियमांतर्गत बळी पडलेली बालके, तीव्र कुपोषित बालके, सॅमबालके, दुर्धर आजार असलेली बालके, व्यसनाधीन बालके, विविध प्रकारच्या दंगलींनी प्रभावित झालेली बालके, कोविड सारख्या रोगाच्या प्रादुर्भावाने दोन्ही/एक पालक गमावलेली बालके, नैसर्गिक आपत्तीमध्ये दोन्ही/एक पालक गमावलेली बालके, बालविवाहाला बळी पडू शकणारी बालके, विधी संघर्षग्रस्त बालके, दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके. रस्त्यावर राहणारी, शाळेत न जाणारी, बालकामगार बालके. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकांची बालके. भिक्षेकरी गृहात दाखल पालकांची बालके (याबाबत भिक्षेकरी गृहाच्या अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.) बालक हे बालसंगोपन योजनेसाठी पात्र असतील.

### या योजनेतंर्गत मिळणारा लाभ

या योजनेतंर्गत नुकतेच शासनाने प्रती बालक दरमहा देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात १ हजार १०० वरुन २ हजार २५० तर स्वयंसेवी संस्थेच्या सहायक अनुदानात रु. १२५/- वरुन रु २५०/- अशी वाढ करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानातून बालकांना अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, वैद्यकीय सुविधा इ. सुविधा संबंधित कुटुंबांमार्फत पुरविण्यात येतात. तसेच स्वयंसेवी संस्थेने सहाय्यक अनुदान रकमेमधून दोन सामाजिक कार्यकर्ता व एक डेटा एंट्री ऑपरेटर यांचे मानधन, प्रत्येक बालकाची केस फाईल, त्यांचे संबंधित अभिलेख, दस्तऐवज इ. हाताळणी व संग्रहीत करण्याचा खर्च, देखरेख, गृहभेटी करीताचा प्रवासखर्च यासह सर्व प्रकारचा प्रशासकीय खर्च करण्यात येईल.

बाल संगोपन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या लाभाचा कालावधी हा अनाथ, स्वतः किंवा दोन्ही पालक दिव्यांग असलेली बालके, स्वत: किंवा पालक एच.आय.व्ही./किंवा कॅन्सरग्रस्त असलेली बालके, कुष्ठरोगग्रस्त पालकाची बालके, तीव्र मतिमंद बालके, अशा बालकांना वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत बाल संगोपन योजनेचा लाभ मिळेल.




कौटुंबिक कलहात सापडलेल्या बालकांना कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याबाबतच्या न्यायालयीन आदेश निर्गमित झाल्यापासून सहा महिन्यापर्यंत किंवा वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. जन्मठेपेची शिक्षा किंवा अन्य शिक्षा भोगत असलेल्या तुरुंगातील पालकांच्या बालकांना पालकांची शिक्षा संपल्यापासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. याकरिता सामाजिक तपासणी अहवालाच्या आधारे बाल कल्याण समितीने निर्णय घेईल.

भिक्षेकरीगृहात दाखल असलेल्या पालकांच्या बालकांना पालक भिक्षेकरी गृहातून मुक्त झालेल्या तारखेपासून सहा महिन्यापर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. कौटुंबिक हिंसाचार प्रकरणात गुंतलेल्या पालकाच्या बालकांना प्रकरण निकाली झाल्याबाबत न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या तारखेपासून ६ महिन्यापर्यंत किंवा बालकाची वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील.

एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयात असणे इ. कारणामुळे कुटुंब विघटीत झाल्याने एक पालक असलेल्या बालकांना लाभ दिल्यानंतर त्याच्या पालकाने पुर्नविवाह केल्यास पुर्नविवाहाच्या तारखेपर्यंत किंवा बालकाच्या वयाची १८ वर्ष पूर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत लाभ देय राहील. बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठीचा कालावधी निश्चित करताना बाल कल्याण समितीने स्वयंसेवी संस्थेचे सामजिक कार्यकर्ता किंवा जिल्हा बाल संरक्षण कक्षातील सामाजिक कार्यकर्ता यांनी प्रत्यक्ष गृहभेट देऊन तयार केलेला सामाजिक तपासणी अहवाल विचारात घ्यावा. त्यानंतर बाल कल्याण समिती समोर प्रकरण परत्वे बालकास हजर करुन अंतिम निर्णय घेतील.

### लाभार्थी निवडीसाठी आवश्यक कागदपत्रे

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ सुधारित अधिनियम २०२१ कलम २ (१४) व महाराष्ट्र राज्याचे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ नुसार अनाथ, निराश्रित, निराधार, बेघर, संरक्षण व निवाऱ्याची गरज असलेल्या ० ते १८ वयोगटातील बालके या योजनेच्या लाभासाठी पात्र असतील. लाभार्थ्याचा रहिवाशी दाखला (तलाठी/ग्रामसेवक/नगरसेवक/सरपंच यांचेकडून निर्गमित दाखला), लाभार्थ्याचे व पालकाचे आधार कार्ड (छायांकीत प्रत). लाभार्थ्याचे / पालकांचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाखापेक्षा कमी असल्याबाबतचा तलाठी / तहसीलदार यांचा दाखला.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबास प्राधान्य देण्यात येईल. आई/वडिलांचा अथवा दोघांच्या मृत्यू दाखला. पालक/आई/वडील यांचे समवेत घरासमोरचा फोटो. बालकांचा जन्म तारखेचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला मिळण्यास विलंब होत असल्यास मागच्या इयत्तेची गुणपत्रक किंवा बोनाफाइड प्रमाणपत्र घेण्यात यावे. बालक व पालक बाल कल्याण समितीसमोर हजर राहणे आवश्यक आहे. ३ ते १८ वयोगटातील लाभार्थी हा शिक्षण घेत असल्यास (शाळेची गुणपत्रिका/बोनाफाईड सोबत जोडावे.) बँक अकाऊंट क्रमांक (पासबुकची छायांकित प्रत) बालकाचा सांभाळ करत असल्याबाबतचे जैविक पालकांव्यतिरिक्त संगोपन कर्त्याचे किंवा नातेवाईकांचे हमीपत्र जोडावे.

कुमारी मातेचे पाल्य, कौटुंबिक हिंसाग्रस्त महिलेचे पाल्य, आई किंवा वडील सोडून गेलेली बालके, दुर्धर आजाराने ग्रस्त पालकांची बालके, दोन्ही पालक अपंग असलेली बालके यांचे करिता प्रकरणपरत्वे पोलीस अहवाल, वैद्यकीय प्रमाणपत्र व ग्रामसेवक यांचा दाखला, बालकांचा सांभाळ करणारी व्यक्ती व्यसनाधीन नसल्याबाबतचा बालकाचा सांभाळ करणाऱ्या व्यक्तीचा सामाजिक तपासणी अहवाल. भिक्षेकरी गृहात दाखल पालकांच्या बालकांकरिता (भिक्षेकरी गृहाच्या अधिक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.) एका पालकाचा मृत्यू, घटस्फोट, पालक विभक्तीकरण, परित्याग, अविवाहित मातृत्व, गंभीर आजार या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे असणे गरजेचे आहे. सर्वसामान्यपणे एका कुटुंबातील दोन बालकांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. तसेच एका कुटुंबात दोनच बालकांना सांभाळ करण्यासाठी ठेवता येईल.

### स्वयंसेवी संस्थाची निवडीचे निकष

आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यामाफ'त प्रत्येक जिल्ह्यातून बाल संगोपन योजना राबविण्याकरिता स्वयंसेवी संस्थांचे अर्ज हे जाहिरात प्रसिद्ध करुन संबधित जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात जमा करतील. त्यानंतर संबंधित जिल्ह्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी स्वयंसेवी संस्थेच्या कार्यालयात भेट देऊन तपासणी करावी व संस्थेच्या मागील तीन वर्षाच्या कार्याबाबत सखोल तपासणी करुन संस्थेला मंजूर करावयाची लाभार्थी संख्या व कार्यक्षेत्राबाबत शिफारस करतील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी करुन आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे हे संस्थेच्या कार्यक्षेत्र व मंजूर करावयाची लाभार्थी संख्या याबाबत स्वयंस्पष्ट शिफारस करुन मंजूर करावयाच्या संस्थाची जिल्हा निहाय यादी शासनाकडे मंजूरीस्तव सादर करतील. शासनाकडून जिल्हा व कार्यक्षेत्र निहाय संस्था व लाभार्थी संख्येस मान्यता प्रदान करण्यात आल्यानंतर. जिल्ह्यात प्रत्यक्षात बाल संगोपन योजनेचे काम सुरु करील. बालसंगोपन योजना राबविणाऱ्या संस्थेला देण्यात येणारी मान्यता आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षासाठी राहील. स्वयंसेवी संस्थेस २०० पेक्षा जास्त मुलांसाठी मान्यता देण्यात येणार नाही.

### संस्थेची जबावदारी व कार्य


पात्र बालकांचे प्रस्ताव मान्यतेकरिता जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालयामार्फत बाल कल्याण समिती कडे सादर करणे. पालक कुटुंबाचा शोध घेणे. संगोपनकर्त्या कुटुंबास मार्गदर्शन करणे. लाभार्थी बालकाच्या प्रगती बाबत लाभार्थी/संगोपनकर्त्या कुटुंबाची नियमित देखरेख ठेवणे. किमान तीन महिन्यातून एकदा गृहभेटी देऊन लाभार्थ्यांचा सामाजिक तपासणी अहवाल जिल्हा महिला व बाल अधिकारी यांचे मार्फत बाल कल्याण समितीकडे सादर करणे. प्रत्येक बालकाचा प्रस्तावा सोबतचे सर्व अभिलेख संगणकीकृत करुन जतन करुन ठेवणे. जिल्हा महिला बाल विकास अधिकारी अथवा शासनाने मागणी केल्यास सदर अभिलेख उपलब्ध करुन देणे. ही योजना १ एप्रिल २०२३ पासून राज्यात लागू राहील. अधिक माहितीसाठी जिल्ह्याच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा.

**संदीप गावित, उपसंपादक**
**जिल्हा माहिती कार्यालय,नंदुरबार**

# शेतकऱ्यांच्या स्वातंत्र्यासाठीच,राज्यात व केंद्रात-स्वतंत्र शेतकरी मंत्रालय

## शेतकऱ्यांच्या हिताचे दृष्टीने काही मुद्द्यावर दृष्टीक्षेप

१) राजकीय पक्ष व सत्ताधीश हे शेतकऱ्यांना उत्पादन वाढविण्याचे सल्ले देतात, उत्पन्न वाढविणे ही देशाची गरज असली तरी, शेतीमालाला भाव कमी देऊन, शेतकऱ्यांचा सत्यानाश केला जातो. शेतकऱ्यांची गरज तेव्हाच कळेल जेव्हा शेतकरी कमी उत्पादन काढतील आणि फक्त स्वतःपुरते पिकवतील. टमाट्याची टंचाई होती म्हणून टमाट्याचे भाव वाढलेत. कांद्याची टंचाई निर्माण होते तेव्हा आहा: कार होतो, सरकार पडते. आयात-धोरणाने शेतीमाल जरी देशात आला तर तो आमदार, खासदार, मंत्री यांचे त्यात हात ओले होतात. म्हणून शेतीमालाची टंचाई नुसती किमान दोन वर्ष निर्माण करणे, गरज तयार झाली आहे. नाहीतर फक्त दूध, मिरची, कांदा, उत्पादने तरी बंद केले तरी सरकार हादरते. किमान दोन वर्ष शेतीचे वहिवाटी करुन शेतीचे पोत दुरुस्त करणे व जमीन कसदार बनविणे, काही भाग पिकवून व बाकी शेतीची मशागत करणे. मात्र जमीन पडीत ठेवू नये. व फक्त स्वतःच्या जगण्या पुरते, स्वतःपुरते पिकविणे शेतमालाची विक्रीच करू नये. शेतकऱ्याला सतत अडचणीत ठेवून शेतमाल बाजारात येण्या साठी ही सोयीची उपलब्धता केल्या जात आहे. उत्पादन वाढविण्याच्या नादात दुकानदार, कारखानदार व इतर यंत्रणा पोसणे कमी करावे, व शेतीवरील खर्च कमी करणे. मागील काळात आपण देशी बियाणे पेरुन खर्च कमी करत होतो. घरातीलच जमा करुन ठेवलेले बी-बियाणे काढून शेती करत होते, तेच आताही किमान दोन वर्ष करावे लागेल. सुखी होण्याच्या नादात आपण इतर उद्योग करुन, बँकेचे कर्ज काढले ती कशी फेडावी याचा विचार करावा लागेल. जनता जरी एकत्र झाली तर कोणताही कोणतीही बँक अडवणार नाही. फक्त दोन वर्ष अडचण सोसावी लागेल पण सर्व रस्ता पुढील पिढीच्या आयुष्याचा मोकळा होईल. सरकार आपोआप शेतकऱ्यांच्या बाजूने बोलायला लागेल व पक्ष प्रतिनिधी हे रस्त्या-रस्त्यावर मार खातील तेव्हाच शेतकऱ्यांची खरी किंमत राज्याला व देशाला कळेल.अन शेतकऱ्याच्या हिताचे कायदे दुरुस्त होतील.उत्पादन वाढीचा फायदा शेतकऱ्याला होत नसून शहरीकरणाच्या, राज कारणाला व शहरातील लोक पोसण्यासाठी होतो. पण अशा संकुचित धोरणाने शेतकरी मात्र मरतो. त्यासाठी शेतीमालाची टंचाई निर्माण करणे, हा मनाला न पटणारा नाईलाज आहे. शेतकरी संघटनेने हे सर्व उपाय या अगोदर केले आहेत, आता पुढील एकच इलाज आहे, बाकी कोणतेही उपाय करुन सरकार हादरत नाही, वठणीवर येत नाही. आता तर ओके -खोके - बोके च्या राज्यात हे शक्यच नाही. रास्ता रोको, जैलं भरो, रेल्वे रोको झाले, भरपूर आंदोलने झाली, यामधून फक्त केसेस शेतकरी कार्यकर्त्यांनी अंगावर लावून घेतले यापेक्षा काहीही फरक पडला नाही. आता शेतकऱ्यांनी मरायचं नाही, तर दुसऱ्याला अडवायचे शिका , तरुणाच्या अंगातील रक्त सळसळते होऊ द्या. हीच खरी अहिंसेच्या मार्गाने होणारी आता अंतिम लढाई आहे.



२)शेतकरी जेव्हा शासन धोरणाच्या विरोधी वागेल तेव्हाच खरी शेतकऱ्यांमध्ये जागृतता येईल. त्यासाठी ही मोहीम सर्व राज्यातील व देशातील शेतकरयांनी एकत्र येऊन करावी लागेल, पुन्हा शेतकऱ्यांचा संप करावा लागेल, उत्पादन कमी आंदोलन करावे लागेल. शहरात शेतीमाल आला नाही तर शहरे ओसाड पडतील , त्याचा परिणाम शहरावर होईल. तेव्हाच सरकार हादरेल. आता रस्त्यावरची लढाई नको, आंदोलने नको, शांततेच्या मार्गाने चालणारे हे तीव्र आंदोलन हे तर ती शेतीत कृतीत करावी लागेल. लॉकडाऊन च्या काळात औद्योगिक उत्पादने बंद होती, तरी देशात कोणती वस्तू मिळाली नाही, कोणताही वस्तूचा तुटवडा नव्हता. पण शेतमाल तयार झाला नाही तुटवडा पडला तर ..... तेव्हा आता पुढील पिढीला हाच निर्णय घ्यावा लागेल. आता सरकारला, सर्व शेतकरी विरोधी वागणाऱ्या व्यवस्थेला चपराक बसण्यासाठी व शेतकऱ्यांना स्वतःचे हित जोपासण्यासाठी आता फक्त हेच करावे लागणार, या पक्ष प्रतिनिधीचे हार तुरे नाही तर जाब विचारणे सुरू करा, तेव्हाच ही व्यवस्था दुरुस्त होईल.

३) शेतकरी हिताचे कायदे तयार करणे गरजेचे आहे, सन १८ जून १९५१ ला केलेली घटना दुरुस्ती मुळे शेतकरी संपविण्यात आला व औद्योगीकरण वाढले, त्यासाठी पुन्हा नव्याने आमदार, खासदार ची संख्या विधानसभेत, संसदेत शेतकरी विरोधी कायदे बदलण्यासाठी लागेल. आणि असे निर्णय राज्य व केंद्र सरकार करण्याच्याच्या मानसिकतेत नाही, आणि असे कायदे एखाद्या पक्षाने केले तरी, इतर राजकीय पक्ष विरोधी आवाज उठवून दुकानदारी साधल्या शिवाय राहत नाही . हे आपण मागील काळात दीड वर्ष दिल्ली येथे चाललेल्या आंदोलनातून पाहिले. काही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या बाजूने होते, तर काही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या विरोधात होते. स्वतःच्या दुकानदारासाठी शेतकऱ्याच्या नावाने राजकीय पाट्यां काढल्या. आताचे कायदे सत्ताधीशांच्या व राजकीय पक्षांच्या फ ायद्याचे आहेत, म्हणून छोट्या पाट्यां आता मोठ्या होऊन फोफावत आहे. कोणताही राजकीय पक्ष शेतकऱ्यांच्या फायद्याचे नाहीत. तर ते जुनेच कायदे अमलात आणणार आहेत, आणि अशा व्यवस्थेत शेतकरी पुन्हा मरणार आहे.

४)शासनाची तिजोरी शहरी विकासात गुंतून पडत आहे. राज्यात व केंद्रात नट नट्या व ज्यांना भुईमुगाच्या शेंगा कुठे लागतात हे कळत नाही असे आमदार, खासदार, अशिक्षित आणि जातीच्या भरोशावर निवडून आणून, राज्य करणे आणि शेतकरी धोरण हाणून पाडणे हा मोठा उद्देश आहे. आता शहरीकरणं वाढविण्याची आवश्यकता संपली. शहरीकरण पोसण्यासाठी सरकारी तिजोरीवर भर पडत आहे. एकट्या मुंबई आणि ठाणे शहरात ६० आमदार आहेत व संपूर्ण विदर्भातील ११ जिल्ह्यात ६२ आमदार आहेत. शेतकऱ्यांना सतत गुलामगिरीत ठेवून राज्य करण्याचे हेतूने सत्ताधीशांनी, व राजकीय पक्षांनी आतापर्यंत सत्ता चालविली. ही जबाबदारी आता पुन्हा शेतकऱ्यावर दुरुस्त करण्याची आली आहे. नुसता शेतकऱ्यांना लॉलीपॉप देऊन, पिकविमा व इतर आमिषे , कोरडे आश्वासने देवून, अनुदान देण्याचे घोषणा करुन फक्त टाईमपास करणे चालू आहे.

५) शेतीचे उत्पादन वाढविताना शेतकऱ्यांच्या वैयक्तिक समस्या तयार झाल्यात. शेतकऱ्यांनी स्वतः दुःखात राहून, इतरांना जगविले. मात्र स्वतःचा घात करुन घेतला. आम्ही एका दाण्याचे १००० दाणे करण्याच्या नादात एका रुपयाचे एक हजार रुपये करणे विसरलो. आपण उत्पादन वाढून खूप पुण्य करतो आहे, या विचारात तो फसला. कारण त्याला सरकारच आपल्या विरोधी वागते हे कळत नव्हते. त्याचे प्रश्न, समस्या गेल्या ७५ वर्षात कोणत्याही राजकीय पक्षाच्या सरकारने सोडविल्या नाहीत. शेतीच्या व्यवस्थेसाठी अनेक मंत्रालय आहेत, परंतु शेतकऱ्यांना न्याय अधिकार व समस्या सोडविण्यासाठी कां स्वतंत्र व्यवस्था तयार करण्यात आली नाही? भारत देश जर कृषीप्रधान देश आहे , तर ती जमीन कसणा?या शेतकऱ्याला तुम्ही जगाचा पोशिंदा , बळीराजा, अन्नदाता, जीवन दाता म्हटले, अन भारत देशात त्याचीच अवहेलना करुन त्याला मातीत घातले, यालाच तुम्ही या देशाचे आर्थिक धोरण म्हणाल काय ?

६) शेतीचे उत्पादन वाढविण्या साठी कृषी मंत्रालय केले, वंशपरंपरेने वाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुळासंबंधी जमिनीचे रेकॉर्ड सांभाळण्यासाठी महसूल मंत्रालय झाले. जमिनीचे क्षेत्रफळ व मोजमाप करण्यासाठी अन वाद-विवाद मिटवीण्यासाठी व वाढविण्यासाठी भुमी लेख कार्यालय झाले, पिकविमाचा कुटील तमाशा उभा केला, श्रम मंत्रालय झाले, अपंग मंत्रालय झाले, राज्याच्या व देशाच्या हितासाठी भूसंपादन कायदा आणला. राजकीय पक्ष चालवण्यासाठी, पक्षाच्या हितासाठी, व सोयीनुसार राज्यात व देशात अनेक कायदे मोडले, तोडले व पुन्हा जोडले, व पुन्हा पुन्हा दुरुस्त केले. मात्र डॉ. आंबेडकरांच्या मूळ संविधानाचे फार चिंधड्या केल्या? स्व. शरद जोशीचा मास्टर प्लॅन लागू होत नाही तर या देशात शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी कोर्टात जावे लागते व तिथे सुद्धा निकाल दुरापास्त झाले. खरे आणि खोटे प्रश्न एकाच तराजूत तोलले जात आहे. शेतीमालाला भाव मागितला तो शेतकरी गुन्हेगार होतो. शेतीची मशागत करत असताना त्याला येणारे आर्थिक, सामाजिक प्रश्न शेतीतील भाऊबंदकीचे वाद , सातबारा वर दहा नावे, शेतीचे रस्ते इतर कौटुंबिक समस्या निर्माण झाल्यात. त्याच्या सुख सुविधासाठी त्याला कर्जातून मुक्त केल्या जात नाही. असे सारे भेडसावणारे प्रश्न त्याच्यावर नजरेसमोर आलेत, कोणाला न्याय मागावा एवढी ताकद सुद्धा त्याच्या विचारात राहिली नाही. म्हणून शेतकऱ्याचे आत्महत्या सत्र असेच सुरू राहणार. एवढ्या गंभीर प्रश्नावर शासन लक्ष कधी घालणार.

७) तर मग शेती वाहणाऱ्या, कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांचे होणारे बेहाल सरकारला दिसले नाही काय ? सरकारला हे सर्व माहीत असून जाणीवपूर्वक राज्य व केंद्र सरकारने शेतकऱ्याला वाळीत टाकले. शेती वाहणाऱ्या जिवंत प्राण्याच्या समस्या सोडविण्या साठी "स्वतंत्र शेतकरी मंत्रालय" का उभे झाले नाही. त्यासाठी मी अनेकदा वृत्तपत्र लेखन, गुगल वर लेखन, करुन स्वतंत्र शेतकरी मंत्रालय का झाले नाही? म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात व देशात चर्चा घडविण्याचा सतत प्रयत्न, व्हाट्सअप द्वारे, फेसबुक द्वारे वृत्तपत्राच्या माध्यमातून, अनेकदा केला. वृत्तपत्रात ४० लेख लिहून शेतकऱ्यांना जागृत केले.

८) कवी, लेखक, ग्रामगीता प्रचारक, आमदार, खासदार, मंत्र्यांनी फक्त सतत शेतकऱ्यांच्या समोर येऊन शेतकऱ्यांच्या दुःखाचे पाढे वाचलेत, व त्यांनी शेतकरयांना भावनाहीन बनवून स्वतःचा हेतू साध्य केला. पारितोषिक मिळवीले, शेतकऱ्यांच्या दुःखाचे गाऱ्हाणे मांडून नावलौकिक मिळविला. कोणी दुःखाच्या कविता, गाणी ऐकून टाळ्या वाजविल्या, कोणी शोक व्यक्त केला आणि त्यातून मनाला गंभीर वेदना सुद्धा झाल्या? शेतीमालाला भाव मागणे हा गुन्हा आहे, तसे कायदे करून ठेवले आहेत. म्हणूनच तर शेतकऱ्यावर गोळीबार व कोर्ट केसेस लाठी हल्ला होतो. स्टेजवर दुःखाचा पसारा मांडून ,स्वहित साधणाऱ्यांची संख्या मात्र सतत वाढत गेली. यांना स्टेजवरदुःखाचे गाणे गावून स्वतःचे हित जोपासता आले तर हरामखोरांनो हे कायदे बदलण्यासाठी सर्वांनी एकत्र कां येत नाही . सर्वांनी मिळून शेतकऱ्याला दुःखाच्या बाहेर का काढले नाही? दरवर्षी पंढरीला लाखो भक्त येतात व विठू रायाला साकडे घालतात. यावर्षी पाऊस येऊ दे, व शेतकरी सुखी होऊ दे. आणि दरवर्षी मुख्यमंत्री सुद्धा येऊन तिथे तेच गाणे गातो . आणि हेच मुख्यमंत्री त्यासाठी स्वतःच्या आमदारांना व खासदारांना कायदे बदलण्याच्या सूचना मात्र देत नाहीत. अशी शोकांतिका किती दिवस जनतेने पहावी.

९) आयात-निर्यात धोरण, खुली अर्थव्यवस्था, व तसेच शेतकरी सुखी होण्यासाठी, महात्मा फुलेंनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी, शेतकऱ्यांचे पंचप्राण शरद जोशी नी, सतत आवाज उठविला, लाठ्या काठ्या खाल्लया, गोळीबार सोसले, शेतकऱ्यांनी जैल भोगले. मात्र आजच्या राज्यकर्त्यांनी शेतकरी स्वतंत्र होऊ दिला नाही. याला पंचवीस वर्षापासून सत्तेत असलेल्या आमदार, खासदार जबाबदार आहेत.

१०) शेतीच्या उत्पादनातून शहरे फुगली, सर्व जगाचा थयथयाट शेतीच्या भरोशावर वाढला. शेतकरी- शेतमजुर हे शासनाची तिजोरी भरुन सरकारला पोसतो आहे, अन गाढव सरकार सांगते की, आम्ही शेतकऱ्यांना पोसतो. शेतकऱ्यांत नुकसानीची व दुःख पचवण्याची दानत फक्त शेतकऱ्यामध्येच आहे. सरकार शेतकरयांना पोसत नाही तर शेतकरी, शेतमजूर सरकारला पोसते. मात्र समाजात चित्र विरुद्ध उभे केले जाते. वृत्तपत्रातून, इलेक्ट्रॉनिक मीडियातून, सरकार शेतकऱ्याला चालवते, हीच उलट परिस्थिती सांगून शेतकऱ्यांच्या माथी मारते.

११) शेतकरी नेते - श्री धनंजय पाटील काकडे यांनी ही सर्व व्यवस्था दुरुस्त करण्यासाठी राज्यात व केंद्रात स्वतंत्र शेतकरी मंत्रालयाची मागणी केलेली आहे. संपूर्ण राज्यात मागे फेब्रुवारी २०२३ या महिन्यात शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघाची जनजागर दिंडी, इतर संघटना सोबत घेऊन ४५०० की.मी. प्रवास पूर्ण करुन वाहन यात्रा काढण्यात आली होती. लोकांच्या भावना लक्षात घेता, राज्यातील जनतेने त्यांना प्रतिसाद दिला. त्यासाठी महाराष्ट्रभर प्रचार यंत्रणा उभी करण्याची, तयारी केल्या जात आहे. राज्यात व केंद्रात शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघाचे प्रतिनिधी निवडून आल्यास निश्चितच स्वतंत्र शेतकरी मंत्रालय मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्याचा पहिला टप्पा म्हणून१५ ऑक्टो. पासून ७ नोव्हें २०२३ पर्यंत विदर्भाचा दौरा होईल, मराठवाडा, दक्षिण महाराष्ट्र व नंतर उत्तर महाराष्ट्र दौरा होईल. शेतकरी विचाराच्या धोरणाचे, आर्थिक धोरणे समजणारी नेते विधान भवन संसद मध्ये पाठवावी लागेल. किमान शंभरच्या वर असली तरच हा प्रश्न निकाली लागेल. शेतकऱ्यांना न्याय, हक्क, अधिकार व समस्या सोडविण्यासाठी, "स्वतंत्र शेतकरी मंत्रालय" मिळणारच ! शेतकऱ्यांना आपल्या हक्काचे, अधिकार मिळवावे लागेल, नुसते मंत्रालय वेगळे करून भागणार नाही, तर ती व्यवस्थाच बदलावी लागेल. यात तीळ मात्र शंका नाही.



**धनंजय पाटील काकडे**
९८९०३६८०५८.शेतकरी, वारकरी-कष्टकरी महासंघ. महाराष्ट्र राज्य.

# कुठलाही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यादृष्टीने नियोजन करा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

## जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीची सभा: मिशन इंद्रधनुष्य मोहिम तिसरा टप्पा ९ ते १४ ऑक्टोबर दरम्यान



**गोंदिया :** लसीकरण हे बालमृत्यू व कुपोषण रोखण्यासाठी प्रभावी साधन आहे. सर्व आजारांवर लढण्यासाठी बाळाला जन्मापासूनच वेगवेगळ्या वयोगटात लसीकरण दिल्यास रोगाविरुद्ध लढण्यासाठी प्रतिकारक शक्ती निर्माण होते. त्यामुळे आरोग्य विभागाने जिल्ह्यातील प्रत्येक गावात लसीकरण सत्राचे आयोजन करुन कुठलाही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही यादृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात नियमीत लसीकरण, विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० मोहिमेची जिल्हास्तरीय टास्क फोर्स समितीची सभा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटिल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कुसुमाकर घोरपडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन वानखेडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.दिनेश सुतार यांची यावेळी प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रसूती झाल्यानंतर २४ तासाच्या आत बाळाला हिपॅटायटीस-बी लसीकरण देणे आवश्यक असल्याने खाजगी नर्सिंग रुग्णालयांनी प्रसूती झाल्यावर बालकास हिपॅटायटीस-बी लसीकरण देऊन आरोग्य यंत्रणेस सहकार्य करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील नियमित लसीकरण, विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० मोहिमे बाबतचे सादरीकरण जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दिनेश सुतार यांनी केले.

जिल्ह्यात सर्व शासकिय आरोग्य संस्थेत बीसीजी, हिपॅटायटीस-बी, पोलिओ, पेंटाव्हॅलंट, रोटा व्हायरस, पीसीव्ही, आयपीव्ही, गोवर-रुबेला, जेई, डिपीटी, विटॅमीन-अ डोज इत्यादी विविध लसीकरण मोफत दिले जात आहे. जिल्ह्यात नियमित लसीकरण अंतर्गत गावनिहाय लसीकरण सत्रे आयोजित करुन बालकांना लसीकरण करण्यात येत आहे. जिल्ह्यात लसिकरणापासुन वंचित राहिलेले किंवा अर्धवट लसीकरण झालेल्या सर्व बालक व गरोदर मातांसाठी विशेष मिशन इंद्रधनुष्य ५.० मोहिम तीन टप्प्यात राबविण्यात येत आहे. पहिला टप्पा ७ ते १२ ऑगस्ट, दुसरा टप्पा ११ ते १६ सप्टेंबर यशस्वी झाल्यानंतर आता अखेरचा तिसरा टप्पा ९ ते १४ ऑक्टोबर २०२३ दरम्यान राबविले जाणार आहे, अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

सभेला जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बाल विकास) संजय गणवीर ,जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. नितीन कापसे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. डी.बी. जयस्वाल, जिल्हा साथरोग तज्ञ डॉ. सुशांकी कापसे, बालरोग तज्ञ डॉ. सुनिल देशमुख, शिक्षण विभागाचे अनिल चव्हाण, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाचे डॉ. ईशान तुरकर, प्रकल्प अधिकारी कार्यालयाचे तुळशीराम वाघाडे, दृष्टी अशासकीय संस्थेच्या सरिता चव्हाण, तसेच ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सागर सोनारे, डॉ. चंदेलसिंह पारधी, डॉ. प्रशांत तुरकर, डॉ. सलिल पाटिल व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुबोध थोटे, डॉ. विजय राऊत, डॉ. अमित कोडनकर, डॉ. ललित कुकडे, डॉ. विनोद चव्हाण व अशासकिय संस्थेचे प्रमुख उपस्थित होते.

# निकृष्ठ बांधकामामुळे चिचगावटोल्यातील निर्माणाधीन जलकुंभ जमीनदोस्त

## कंत्राटदारावर ५० हजाराचा दंड



**गोदिया :-** निर्माणाधीन जलकुंभाचे बांधकाम मानक व नियमानुसार होत नसल्याचा कारणावरुन ८० टक्के बांधकाम झालेला जलकुंभ जमीनदोस्त करण्याचा प्रकार गोरेगांव तालुक्यातील चिचगावटोला येथे उघडकीस आला आहे. प्रत्येक नागरिकाला पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे हा शासनाचा उद्देश असून गोंदिया जिल्ह्यात ४७६ कोटी खर्चातून जवळपास २५० गावांमध्ये शासनाच्या जलजीवन मिशनअंतर्गत जलकुंभांचे निर्माण करण्यात येत आहे. मात्र, या निर्माणाधीन कार्यालाही भ्रष्टाचाराचे गालबोट लागले आहे. असाच प्रकार गोरेगांव तालुक्यातील चिचगावटोला गावात उघडकीस आला असून याप्रकरणी जिल्हा परिषद सदस्यांनी जिल्हा परिषदेकडे ६ महिन्यांपूर्वी तक्रार केली होती. त्या तक्रारीच्या आधारे सदर कंत्राटदाराला टाकीचे बांधकाम करतांना चुकीच्या पध्दतीने बांधकाम झाल्याचे निदर्शनास आणून देत तिथूनच बांधकाम तोडून नव्याने काम करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या.

परंतु जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या सुचनेनंतरही कंत्राटदाराने बांधकाम सुरुच ठेवल्याचे जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र कटरे यांनी विभागाच्या लक्षात आणून दिले. ८० टक्के बांधकाम पूर्ण झाल्यानंतर परत जलकुंभाची पाहणी केली. त्या जलकुंभाच्या कामात दोष असल्याने निमर्णाधीन बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले. तसेच सबुरी कन्स्ट्रक्शन कंपनीला ५० हजार रुपये दंड ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने ठोठावला आहे. गोंदिया जिल्ह्यातील जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या इतर पाणीटाकींचीही तपासणी केल्यास अनेक बांधकामांत दोष आढळून येण्याची शक्यता आहे.

### तक्रार केली होती, सखोल चौकशी करा

**४७६ कोटी रुपयांच्या निधीतून जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जिल्ह्यात जलकुंभ बांधकामाचे काम सुरू आहे. मात्र चिचगाव ग्रामपंचायतीच्या हद्दीत सुरू असलेले बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होते. ज्याबाबत तक्रार केली होती. निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे ही पाण्याची टाकी पूर्ण होण्यापूर्वीच जेसीबीने पाडण्यात आली. त्याचप्रमाणे या योजनेअंतर्गत इतर ठिकाणी सुरू असलेल्या बांधकामांचीही सखोल तपासणी करण्याची गरज आहे. शासनाचे जे लाखो रुपयांचे नुकसान होत आहे त्यासाठी इतर कोणी नसून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांचा दुर्लक्षपणा जबाबदार धरले पाहिजे.**

**जितेंद्र कटरे,** जि.प.सदस्य, शहारवानी, गोंदिया

### निर्देशानंतरही कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्याने बांधकाम पाडले

**मंजूर स्ट्रक्चर व मानकांनुसार जलकुंभाचे बांधकाम नव्हते. त्यामुळे पाहणी दरम्यान संबंधित कंत्राटदाराला चुकीचे बांधकाम पाडून नवीन बांधकाम करण्याची सूचना देऊनही त्याने जुन्याच बांधकामानुसार टाकीचे काम सुरू ठेवल्याचे लक्षात आल्याने कंत्राटदारास जलकुभं पाडण्याचे निर्देश देण्यात आले, त्यानुसार पाडण्यात आले असून कंपनीवर दंड ठोठावण्यात आला आहे. कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुमित बेलपत्रे यांनी सांगितले.**

# धापेवाडा-कुडवा मार्गाच्या २२ कोटींच्या निधीतून लवकरच होणार नवीनीकरण-आ.विनोद अग्रवाल

**गोंदिया:** शहरातील कुडवा गावातून अभियांत्रिकी महाविद्यालय, हिवरा, रत्नारा, नवेगाव धापेवाडा या मार्गावरील जीर्ण रस्त्याच्या बांधकामाबाबत अनेक महिन्यांपासून आवाज उठवला जात होता. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्याने दररोज अपघात होत होते. या रस्त्याच्या कामासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी गांभीर्यतामुळे प्रयत्न केले असून धापेवाडा ते कुडवा चौक आणि कुडवा ते गोंदिया-तिरोडा महामार्गाच्या जोडरस्त्यापर्यंत हा रस्ता पूर्ण करण्याचा संकल्प केला असून सुमारे २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे, ज्याचे काम लवकरच सुरु होणार आहे.



२३ सप्टेंबर रोजी आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते नवेगाव ते कुडवा गावापर्यंतच्या रस्त्याच्या कामाचे भूमीपूजन अनुक्रमेनुसार करण्यात आले. यावेळी त्यांनी गावात सुरू असलेल्या सिमेंट रस्त्यांच्या कामाची माहिती दिली. या रस्ता बांधकामाच्या भूमिपूजन समारंभात आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, ४ वर्षात प्रत्येक गावात विकासकामे करण्याचा प्रयत्न केला. या कार्यकाळात आपण कोरोनाचे संकटही पाहिले, तरीही मी माझे कर्तव्य कसे पार पाडायचे याचा प्रयत्न करत होतो. आमदार अग्रवाल म्हणाले की, प्रत्येक गावात चांगले काम करण्याचा प्रयत्न केला असून सध्याही गावे सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आज गोंदिया विधानसभा मतदारसंघात सर्वत्र रस्त्यांची कामे सुरू आहेत. प्रत्येक गावात दुरुस्ती, सिमेंटीकरण, नूतनीकरण, रुंदीकरण आणि नवीन रस्त्यांचे बांधकाम सुरू आहे. प्रत्येक सामाजिक वर्गासाठी विकासाची कामे केली आहेत. ते म्हणाले, गेल्या ४ वर्षात मी कोणती विकासकामे केली, याचा विचार तुम्हीच करा. २७ वर्षांच्या तुलनेत कृतींचा आढावा घेऊन विचार केला तर नक्कीच उत्तर मिळेल. या सडक भूमिपूजन कार्यक्रमादरम्यान ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक व ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या हस्ते ठिकठिकाणी भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊराव उके, चाबी संघटनेचे तालुकाध्यक्ष छत्रपाल तुरकर, कमलेश सोनवाणे, विक्की बघेले, उर्मिला लाजेवार सरपंच नवेगाँव, प्रेमचंद मेशराम उपसरपंच दुलीचंद लाजेवार, सुशीला लिल्हारे सरपंच नीलगोंदि, मुरली नागपुरे सरपंच देवरी यांच्यासह जनता की पार्टी चाबी संघटनेचे सर्व पदाधिकारी, जी.प. सदस्य, पं.स. सदस्य, ग्राम पंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य व नागरिक उपस्थित होते.

# ग्राहकांनी गॅस टाकी विकत घेतांनी रितसर वजन करुन घ्यावे

**गोंदिया :** जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी प्रकाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षण अधिकारी सतीश नाईक आणि पुरवठा निरीक्षक पांडुरंग हांडे यांनी केलेल्या कारवाई दरम्यान अरविंद गॅस एजन्सी, गणेशनगर, गोंदिया यांच्याद्वारे ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या गॅस टाक्या प्रमाणभुत वजनापेक्षा कमी वजन असलेल्या आढळून आल्याने संबंधित गॅस एजन्सीविरोधात अत्यावश्यक वस्तु अधिनियम तसेच एलपीजी अधिनियम २००० अन्वये शहर पोलीस स्टेशन गोंदिया येथे ५ ऑक्टोबर २०२३ रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. सदर प्रकरणात पुढील तपास शहर पोलीस स्टेशन करीत आहे.

गोंदिया तालुक्यातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते की, आपण गॅस टाकी विकत घेतांना रितसर वजन करुन घ्यावे. वजन काटा उपलब्ध नसल्यास किंवा वजन करण्यास टाळाटाळ केल्यास किंवा अशाप्रकारे प्रमाणभुत वजनापेक्षा कमी वजनाच्या गॅस टाक्या आढळल्यास तहसिल कार्यालय, गोंदिया येथील दुरध्वनी क्रमांक ०७१८२-२३६७०३ यावर संपर्क करावा.

# भाजपच्या आयटी सेलवकर कारवाई करा



गोंदिया: केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि भाजप घेत असलेल्या निर्णयांच्या विरोधात काँग्रेसतर्फे शहरात निदर्शने करण्यात आली.

जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीने उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर मोदी सरकारच्या विरोधात निदर्शने केली. जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड यांच्या नेतृत्वाखाली निदर्शने करण्यात आली. काँग्रेस नेते राहूल गांधी यांच्या छायाचित्राशी छेडछाड करुन त्या छायाचित्राला रावणाची उपमा देण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे. हे छायाचित्र भाजपने समाजमाध्यमात प्रसारित केले आहे. सर्व आघाड्यांवर अपयशी ठरलेल्या आणि इंडिया आघाडीला घाबरलेल्या भाजपने नैराश्यातून हे कृत्य केले आहे, अशी टीका काँग्रेसने केली. तसेच राहूल गांधी यांना रावणाची उपमा देणाऱ्या भाजप आणि मोदी सरकारच्या विरोधात उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदींना हुकूमशाही मोदी अशा घोषणा देण्यात आल्या. या निषेध आंदोलनात प्रदेश सचिव अमर वऱ्हाडे, पी.जी.कटरे, महिला जिल्हाध्यक्ष वंदना काळे, डेमेंद्र रहांगडाले, ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष राधेलाल पटले, गोंदिया कृउबासचे उपसभापती पप्पू पटले, सूर्यप्रकाश भगत, योगेश अग्रवाल, राजू काळे, जहीर अहमद, चित्रा लोखंडे, सुनील भोंगाडे, सुरेश चौरागडे, राजीव ठकरेले, आनंद लांजेवार आदी सहभागी झाले होते.

# जिल्हा परिषद महिला बालकल्याण विभागाला निधी द्या

## माधुरी रहांगडाले: समाजकल्याण मंत्र्यांना दिले निवेदन




**तिरोडा:** जिल्हा परिषद महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता त्वरित निधी उपलब्ध करुन द्या अशी मागणी जिल्हा परिषद सदस्य माधुरी रहांगडाले व रचना गहाणे यांनी केली आहे. यासाठी त्यांनी बहुजन समाजकल्याणमंत्री अतुल सावे यांना निवेदन दिले.

ग्रामीण भागात समाजकल्याण व महिला बालकल्याण विभागामार्फत अनु.जाती-जमाती प्रवर्गातील महिला व विद्यार्थ्यांना सिलाई मशीन, सायकल व इतर साहित्य पुरविले जातात. परंतु इतर प्रवर्गाकरिता उदाहरणात ओबीसी, खुला, एनटी, एसबीसी या प्रवर्गातील महिला व विद्यार्थ्यांना या विभागाच्या योजनांपासून वंचित ठेवले जाते. त्यामुळे ग्रामीण भागातील लाभार्थी जनता आक्रोशीत आहेत. त्याचा परिणाम जनप्रतिनिधींवर खूप मोठ्या प्रमाणात होत आहे.

जिल्हा परिषदेला ओबीसी, खूला, एनटी, एसबीसी व इतर सर्व प्रवर्गाकरिता एकूण पाच कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात यावा जेणेकरुन या सर्व गरजू महिला व विद्यार्थ्यांनी जे अर्ज केलेले आहेत त्यांनाही लाभ देणे सोईचे होईल अशी मागणी रहांगडाले व गहाणे यांनी केली आहे.

निवेदन देताना जि.प.सदस्य रहांगडाले, गहाणे यांच्यासह जि.प. सदस्य व गटनेते लायकराम भेंडारकर, अंजली अटरे, जयश्री देशमुख, पोर्णिमा ढेंगे, हनुमंत वट्टी, कविता रंगारी, प्रीती कतलाम, पं.स.सदस्य चित्रकला चौधरी, सरपंच प्रतिभा भेंडारकर, जि.प.सदस्य बी.एन.पटले, किशोर महारवाडे यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# क्षेत्रातील शेवटचा घटकाच्या विकासासाठी शेवटच्या श्वासापर्यंत झटत राहणार-इंजि.यशवंत गणविर



**अर्जुनी मोरगाव :-** तालुक्यातील गवर्री येथे क्रांतीसुर्य महामानव भगवान बिरसा मुंडा स्मारकजवळ वाचनालय व आवारभिंतिच्या बांधकामांचे भुमिपुजन संपन्न झाले. या कार्यक्रमाप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना गणविर म्हणाले, आपला क्षेत्र हा अतिदुर्गम आदिवासी बहुल नक्षलग्रस्त क्षेत्र आहे,आणि मागील कित्येक वर्षांपासून विकासापासून कोसो दुर आहे, त्यामुळे आजही आपल्या क्षेत्रातील शेवटचा घटक वंचित आहे. त्या शेवटचा घटकाचा विकास व त्याची क्रयशक्ती वाढविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील राहणार. कारण शेवटच्या घटकाचा विकास झाल्याशिवाय क्षेत्राचा विकास होणार नाही.

पुढे बोलताना ते म्हणाले, आज आपल्या छोट्याशा गावात वाचनालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करताना आनंद गगणात मावेनासा झाला कारण या गावातील युवा मित्रांची जिद्द आणि चिकाटी,मागील तीन वर्षांपासून त्यांनी रेटुन धरलेल्या मागणीला यश मिळाले. युवा मित्रांनी केलेल्या त्यांच्या या कार्याला मी सलाम करतो. आनंद वाटतो की, अतिदुर्गम आदिवासी बहुल क्षेत्रातील युवा जागृत होऊन समाजकार्यात आपला सहभाग दर्शवतो यांच्या कडुन प्रेरीत होऊन आपल्या गावातील इतर युवा सुद्धा समोर येऊन काम करतील आणि गावाच्या विकासात हातभार लावतील असे प्रतिपादन त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्या आम्रपाली डोंगरवार, रांकापा तालुकाध्यक्ष लोकपाल गहाणे, सरपंच नरेंद्र लोथे, उपसरपंच सचिन साखरे, रांकापा विधानसभा अध्यक्ष योगेश नाकाडे, माजी पंचायत समिती सदस्य दिनदयाल डोंगरवार, प्रल्हाद वंजारी तथा ग्रामपंचायत सदस्य व गावकरी उपस्थित होते.

# नाना पटोले हे ओबीसी विरोधी नेते असल्यानेच ते ओबीसी आंदोलनापासून दूर राहिले-डॉ. आशिष देशमुख



**गोंदिया:-** "ओबीसींचा उद्धार हाच भाजपाचा ध्यास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मागील ९ वर्षातील विकासकार्य बघता पुढील काही वर्षत भारत विश्वगुरु म्हणून उदयास येईल. ओबीसी आयोगाला त्यांनी संवैधानिक दर्जा दिला, त्यामुळे ओबीसी कल्याणाचे अनेक प्रश्न मार्गी लागले. राज्यात ओबीसींच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आणि त्यांना न्याय देण्यासाठी भाजपाचे देवेंद्र फडणवीस यांनी स्वतंत्र ओबीसी मंत्रालयाची स्थापना केली. ओबीसी समाजाचा सर्वांगीण विचार करणारा पक्ष म्हणजे भारतीय जनता पक्ष. भाजपा ओबीसींचा आणि ओबीसी भाजपाचा हा आमचा मूलमंत्र आहे. या ओबीसी जागर यात्रेला सर्वत्र उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे, सर्वत्र जंगी स्वागत होत आहे. राजीव गांधींनी मंडल आयोगाला विरोध केला होता. काँग्रेसने ओबीसींचा द्वेष केला, हे मागील अनेक वर्षांतील त्यांच्या व्यवहारावरुन सिध्द झाले आहे.

ओबीसी विद्यार्थ्यांना नोकरीत सामावून घेण्याची संधी भाजपाने उपलब्ध करुन दिली. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे ओबीसी आंदोलनात सहभागी झाले नाहीत कारण त्यांना वरुन तसा आदेश आहे. ओबीसी आरक्षणात कोणालाही वाटेकरी होऊ देणार नाही, ओबीसींचा एक टक्काही कमी होऊ देणार नाही, भाजपा १००% ओबीसींच्या पाठीशी आहे. ओबीसींचा उद्धार हाच भाजपाचा निर्धार!", असे प्रतिपादन भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेश प्रभारी माजी आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी येथे केले

यात्रेचा भाजपकडून प्रचार प्रसार करुन ही ओबीसी बांधवांनी या यात्रेकडून आपली पाठ फिरविल्याचेच दिसून आले. गोंदियातील जयस्तंभ चौकातून काढलेल्या रैलीत सामसूम दिसून आला. त्यानंतर गोंदियातील एका सभागृहात भरविलेल्या सभेत ही, ही भाजपची ओबीसी जागर यात्रेची सभा की भाजपचा पदाधिकारी मेळावा अशीच चिन्हे दिसून आली. महाराष्ट्र भ्रमण करणाऱ्या भाजपाच्या ओबीसी जागर यात्रेतर्फे पाचव्या दिवशी गोंदिया येथे ठिकठिकाणी जनसंपर्क साधून भव्य मेळावा घेण्यात आले.

या प्रसंगी मा. आमदार विजय रहांगडाले, संजय गाते-अध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र, अर्चनाताई डेहनकर-प्रदेश महामंत्री ओबीसी मोर्चा, येशूलाल उपराडे-जिल्हाध्यक्ष, गजेंद्र फुंडे, रचनाताई गहाने, विजय शिवणकर, सिताताई रहांगडाले, ओम कटरे, धनलाल ठाकरे, रविंद्र चव्हाण, रवि येनूरकर, डि.डी. सोनटक्के, निलेश गुडधे, प्रकाश बगमारे-ओबीसी महाराष्ट्र प्रदेश सदस्य व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# साडेचार क्विंटल गोमांसाची तस्करी, दोन आरोपी ताब्यात




**गोंदिया :** जिल्ह्यात गोमांस तस्कर सक्रीय असून शनिवारी सायंकाळच्या सुमारास सालेकसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत साडे चार क्विंटल गोमांस वाहतूक करणा?या दोन गोमांस तस्करांना सालेकसा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी दोन्ही आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली असून त्यांच्या जवळून गोमांस व वाहतूकीसाठी वापरलेली कार असा एकूण ६.५७ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वसीम नासीर कुरेशी (वय २९), प्रमोद राजकुमार मोहबे (वय ३३) दोघेही राहणार कुंभारटोली, आमगाव अशी अटक करण्यात आलेल्या तस्करांची नावे आहेत.

सालेकसाचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांच्या पथकाने सालेकसा येथील आमगाव दरेकसा मार्गावरील एचपी पेट्रोल पंपासमोर नाकाबंदी कारवाई केली. यावेळी पंचासमक्ष पांढ?या रंगाची कार क्रमांक एमएच ४६ एक्स ७५४१ ला थांबवून पाहणी केली असता कारच्या मागच्या सिटवर १५ थैले आढळून आले ज्यामध्ये अंदाजे ३० किलो ग्रॅमप्रमाणे ४५० किलो ग्रॅम गोमांस दिसून आले. ज्याची किंमत ६७ हजार ५०० रुपये आहे. यावेळी दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता सदर गोमांस डोंगरगड येथे विना परवाना नेत असल्याचे आरोपींनी सांगितले

.या प्रकरणी सोलकसा पोलिसांनी दोन्ही आरोपींच्या विरोधात कलम ५,५(सी),९,९(ए) महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा नोंद करून आरोपींना अटक केली. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक अरविंद राऊत करीत आहेत. ही कारवाई पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, प्रभारी उपविभागीय पोलिस अधिकारी किशोर पर्वते यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, पोलिस उपनिरीक्षक अजय पाटील, पोलिस नायक रितेश अग्निहोत्री, पोलिस शिपाई इंगळे, वेदक, कटरे, गोसावी यांनी केली

### २३ ऑक्टोबर पर्यंत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया :** जिल्ह्यात ९ ते २३ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रास्तो रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत. तसेच आगामी काळात दुर्गा/शारदा उत्सव असून सदर उत्सवाचे पार्श्वभूमीवर जिल्ह्यात होणाऱ्या असामाजिक तत्वांचे कृत्यास/घटनांना आळा घालण्यासाठी सदर उत्सवा दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत दिनांक ९ ते २३ ऑक्टोबर २०२३ पर्यंत स्मिता बेलपत्रे यांनी मनाई आदेश लागू केले आहे.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, गोंदिया

**निविदा सूचना क्र.२७ सन २०२३-२०२४ (प्रथम मागणी)**

**गोंदिया पाणी पुरवठा योजना ता.व जि.गोंदिया देखभाल व दुरुस्ती अंतर्गत हेडवर्क्स डांगुर्ली पंपहाऊस येथे २५० Hp नवीन ऑटो ट्रॉन्सफार्मर स्टार्टरचा पुरवठा व उभारणी करण्याच्या** कामाची निविदा मजीप्रा कडून मागविण्यांत येत आहे. कामाची **अंदाजित किंमत रू.३,८०,६२९/- आहे.** सदर निविदेचा सविस्तर तपशील **दिनांक १२/१०/२०२३ ते दि.२६/१०/२०२३ पर्यंत** विभागीय कार्यालयामध्ये उपलब्ध आहे.

**कार्यकारी अभियंता**
**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**विभाग, गोंदिया**

# गोंदिया जिल्ह्याला चार वर्षांत मिळाले पाचवे पालकमंत्री

**गोंदिया :-** स्थानिक पालकमंत्र्यांच्याबाबतीत गोंदिया जिल्हा नेहमीच दुर्दैवी ठरला आहे. जिल्हा निर्मितीनंतर महादेवराव शिवणकर, राजकुमार बडोले आणि परिणय फुके वगळता नेहमी इतर जिल्ह्यातील नेतेच पालकमंत्री म्हणून लाभले. २०१९ मध्ये झालेल्या निवडणुकीनंतर आत्तापर्यंत चार वर्षांच्या काळात गोंदिया जिल्ह्याला पाचवे पालकमंत्री मिळाले.

गोंदिया जिल्हा राज्याच्या पूर्व टोकावर आहे. निसर्गसंपन्न आणि जंगलव्याप्त असल्यामुळे या जिल्ह्याला विशेष स्थान आहे. मात्र नक्षलग्रस्त आणि आदिवासीबहूल असल्यामुळे या जिल्ह्याकडे राज्य शासनाचे कायमच दुर्लक्ष झाले. प्रफुल्ल पटेल यांच्यासारखे वजनदार नेते असूनही त्याचा फारसा लाभ जिल्ह्याला झाला नाही. महादेवराव शिवणकर राज्याचे मंत्री असताना भंडारा जिल्ह्याची विभागणी झाली.

गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून शिवणकर यांनी प्रभावशाली भूमिका बजावली होती. त्यानंतरच्या काळात मात्र जिल्ह्यावर कायमच बाहेरचे पालकमंत्री लादण्यात आले. या पूर्वीचे पालकमंत्री तर वर्षातून फक्त झेंडावंदन करण्याकरिताच येत होते. त्यामुळे त्यांना "झेंडामंत्री' अशी बिरुदावलीदेखील लाभली.

गोंदिया जिल्ह्याचे सर्वाधिक काळ पालकमंत्री राहिलेले अनिल देशमुख यांनी गृहमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. तर युतीच्या काळात जिल्ह्याच्या पालकमंत्री असलेले राजकुमार बडोले यांनी शेवटच्या सहा महिन्यात मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता.

युती सरकारच्या काळात भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन गोंदिया जिल्हा अस्तित्वात आला. पहिले पालकमंत्री प्रा. महादेवराव शिवणकर हे होते. त्यानंतर मात्र गोंदिया जिल्ह्याला स्थानिक पालकमंत्री लाभले नाही. २०१४ मध्ये भाजप-शिवसेना युतीचे सरकार सत्तेवर आले तेव्हा अर्जुनी-मोरगाव मतदारसंघातून दुसऱ्यांदा निवडून आलेले राजकुमार बडोले सामाजिक न्यायमंत्री झाले. त्यांना गोंदियाचे पालकमंत्री करण्यात आले. १४ वर्षांनंतर मूळ जिल्ह्यातील व्यक्ती पालकमंत्री झाले होते. मात्र त्यांना शेवटच्या सहा महिन्यात आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर डॉ. परिणय फुके यांना गोंदियाचे पालकमंत्रिपद मिळाले होते. सहा महिन्यानंतर विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आले. आणि पुन्हा गोंदिया जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी अनिल देशमुख यांच्याकडे आली.

काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी सरकारच्या सत्ताकाळात देशमुख गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री होते. जिल्ह्याचे पालकमंत्री पद साभांळणारे अनिल देशमुख यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा लागला होता. देशमुखांनी मंत्रीपदाचा राजिनामा दिल्यानंतर नवाब मलीक यांच्याकडे जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सोपवण्यात आले. मात्र तेदेखील मंत्रीपदावरुन पायउतार झाल्याने मविआ सरकार असेपर्यंत प्राजक्त तनपुरे पालकमंत्री होते. त्यानंतर मागच्या वर्षी ३० जून रोजी राज्यात सत्तांतर झाले. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे गोंदियाचे पालकमंत्रीपद आले. सरकारची वर्षपूर्ती झाली असताना पुन्हा सत्तेत राष्ट्रवादी काँग्रेसचा अजित पवार गट सहभागी झाला. तेव्हापासून नव्या पालकमंत्र्याची जिल्ह्याला वाट होती. त्यानुसार ४ ऑक्टोंबरला जाहिर झालेल्या यादीनुसार गडचिरोली जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्याकडे गोंदिया जिल्ह्याचे पालकत्व आल्याने चार वर्षात पाच पालकमंत्री गोंदिया जिल्ह्याला लाभले आहे.

गोंदियात यापूर्वी दत्ता मेघे, विजयकुमार गावित, नाना पंचबुद्धे यांनीही जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी सांभाळली आहे.



### गोंदिया आणि देशमुख हे समीकरण

**गोंदियाचे सर्वाधिक काळ पालकमंत्री राहण्याचा बहुमान अनिल देशमुख यांनाच मिळाला. ते १२ वर्षे गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री होते. गोंदिया जिल्हा आणि पालकमंत्री अनिल देशमुख हे समीकरणच झाले होते. देशमुखांची नाळ गोंदिया जिल्ह्याशी चांगलीच जुळली होती. आघाडीचे सरकार आले की, खेड्यापाड्यातील व्यक्ती आपला पालकमंत्री अनिल देशमुखच होणार असे ठामपणे सांगायचे. या दरम्यान, देशमुख फक्त शासकीय ध्वजारोहण व विशेष कार्यक्रमप्रसंगीच येत असल्याने त्यांची झेंडामंत्री म्हणून ओळख विरोधकांनी तयार केली होती. मात्र जिल्ह्यातील कार्यकर्ते आणि नेत्यांशी त्यांचा कायम संपर्क होता.**

### मुनगंटीवारही बैठक पालकमंत्री निघाले

**सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे पालकमंत्री पदाची जबाबदारी दिल्यानंतर त्यांनी आपल्या वर्षभराच्या कार्यकाळात ३- ४ बैठकांच्या निमित्तानेच गोंदियाला भेट दिली. झेंडावंदनाला मात्र त्यांनी हजेरी लावली नाही. पालकमंत्री झाल्यानंतर पहिल्या डीपीडीसी बैठकीला दिवाळीपुर्वी आले. त्यानंतर ते मार्चमध्ये डीपीडीसीच्या बैठकीला आले. नागझिरा व्याघ्रप्रकल्पात वाघ सोडायला आले असे महत्वाचे इव्हेंट वगळले तर मुनगंटीवारांनीही जिल्ह्याकडे पालकमंत्री म्हणून काही खास न केल्याने ते बैठक व इव्हेंटमंत्रीच ठरले.**

# प्रफुल्ल पटेलांच्या बालेकिल्ल्यात शरद पवारांची तोफ धडाडणार



**गोंदिया :** केंद्रीय निवडणूक आयोगाकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कुणाचा, यावर सुनावणी सुरू असून सोमवारी यावर निकाल लागणार आहे. या पार्श्वर्पभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाची येथे बैठक झाली. या बैठकीत शरद पवार यांच्या आगामी बैठकीचे सुतोवाच करण्यात आले. यामुळे अजित पवार गटाचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या गृहनगर असलेल्या बालेकिल्ल्यात लवकरच शरद पवारांची तोफ लवकरच धडाडणार आहे.

या सभेनंतर गोंदिया जिल्हा प्रफुल्ल पटेल की शरद पवार यापैकी कोणाचा समर्थक आहे, हे कळेल, असे शरद पवार गटाचे बजरंग परिहार यांनी म्हटले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारी अध्यक्ष खा. सुप्रिया सुळे यांची नागपूर येथे नुकतीच बैठक झाली. सुळे यांनी गोंदिया जिल्ह्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात सांगितले. त्या अनुषंगाने पक्षातील संघटनात्मक बांधणीवर जोर दिला जात आहे. याकरिता पुढील आठवड्यात जिल्ह्याचे प्रभारी आ. रोहित पवार व आ.अनिल देशमुख दौऱ्यावर येणार आहेत. त्यानंतर शरद पवार यांची येवला आणि बीडसारखीच मोठी जंगी सभा गोंदियातही होणार आहे. काही नेत्यांनी वेगळा विचार करुन गट स्थापन केला, तरी जनता व पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता शरद पवार यांच्या सोबतच असल्याचे येवला आणि बीड येथील सभेतून दिसून आले.

गोंदिया जिल्ह्यातील बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शरद पवारांच्या समर्थनार्थ प्रतिज्ञापत्रे दिली आहेत. शरद पवार यांची सभा यशस्वी करण्याची पूर्वतयारी म्हणून पक्षबांधणी केली जात आहे, असे परिहार यांनी सांगितले. शरद पवार गटात सहभागी होण्याची इच्छा असलेल्या गोंदिया, भंडारा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांवर प्रफुल्ल पटेल यांच्या कंपनीकडून दबाव आणला जात आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे दीनानाथ पडोळे, दिलीप पणकुले, मिथुन मेश्राम, तिरथ येटरे, सौरभ रोकडे उपस्थित होते. यावेळी आमगाव तालुकाध्यक्ष भुमेश शेंडे, अर्जुनी मोरगाव तालुका अध्यक्ष सुरेश खोब्रागडे, सडक अर्जुनी तालुका अध्यक्ष दिनेश कोरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी शेकडोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# उड्डाणपुलाचे काम डिसेंबरपासून सुरु होणार

## दोन वर्षांपासून रखडले बांधकाम: बांधकाम विभागाची बैठक



**गोंदिया:** शहरातील गोंदिया-बालाघाट मार्गावरील रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम अद्यापही सुरु न झाल्याने शहरवासीयांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या पुलाचे बांधकाम त्वरित सुरु करण्यात यावे, यासह इतरही बांधकामाचा आढावा घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यात बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले.

गोंदिया-बालाघाट मार्गावरील उड्डाणपुल बांधकामाला २०१९ मध्ये मंजूरी मिळाल्यानंतर या पुलाचे बांधकाम अद्यापही सुरु झाले नाही. परिणामी, शहरात वाहतुकीची कोंडी आणि पुलाच्या दोन्ही बाजुकडील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. तर याचा येथील व्यवसायांवरसुद्धा परिणाम झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा याची दखल घेत पुलाचे बांधकाम त्वरित सुरु करण्याच्या सुचना बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता नंदनवार यांना केली होती. पण यानंतरही उड्डाणपुलाचे काम सुरु झाले नाही. यावर माजी आ.गोपालदास अग्रवाल यांनी बैठकीत नाराजी व्यक्त केली. यावेळी मुख्य अभियंता नंदनवार यांनी अधिक्षक अभियंता भानुसे आणि कार्यकारी अभियंता लभाणे यांच्याकडून पुलाच्या बांधकामाची माहिती घेऊन निविदेला त्वरित अंतिम मंजुरी देऊन शासनाकडे सादर करण्यास सांगितले. मंजुरी मिळताच डिसेंबरपासून उड्डाणपुलाचे काम सुरु करण्याचे आश्वासन नंदनवार यांनी दिले. बैठकीला उपविभागीय अभियंता लांजेवार, बगडे, कनिष्ठ अभियंता हरणे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

### मरारटोली, हड्डीटोली रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपुल

शहरातील मरारटोली, हड्डीटोली येथील रेल्वे उड्डाणपुलाचे काम २०१९ पासून प्रलंबित आहे. परिणामी, नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या पुलाचे कामसुद्धा दिवाळीनंतर सुरु करण्यात येणार असल्याचे बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी बैठकीत सांगितले. कुडवा, धापेवाडा, कटंगी-रावणवाडी-कामठा व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याकडे अग्रवाल यांनी लक्ष वेधले.

# ओबीसी समाज प्रबोधन मेळावा उत्साहात

**गोरेगाव:** तालुक्यातील मोहाडी येथील आदर्श वाचनालयाच्या सभागृहात रविवार (दि.८) ओबीसी सेवा संघातर्फे ओबीसी समाज प्रबोधन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात ओबीसींच्या जाती जनगणनासह विविध विषयांवर मंथन करुन चर्चा करण्यात आली.

ओबीसी समाज प्रबोधन मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा.बी.एम. करमकर होते. मार्गदर्शक म्हणून ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे तर प्रमुख अतिथी म्हणून ओबीसी सेवा संघाचे राज्य संघटन सचिव सावन कटरे, डॉ. गुरुदास येडेवार, भुमेश ठाकरे, सचिन बघेले, वाय.डी.चौरागडे, लिखीराम बघेले उपस्थित होते.

याप्रसंगी मेळाव्याचे अध्यक्ष करमकर व बबलू कटरे यांनी प्रबोधन केले. तसेच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष साजरा केला तरी राज्यकर्ते ओबीसी जनगणना करुन ओबीसी जातींची सामाजिक, शैक्षणिक आर्थिक स्थिती जाणून संख्येप्रमाणात हिस्सेदारी द्यायला का तयार नाही? सरकार ओबीसी परदेश शिष्यवृत्ती, आधार योजना, वसतिगृहांचे जीआर काढते, पण वित्तमंत्री निधी का देत नाही? शाळांचे कंपनीकरण, नोकऱ्यांचे कंत्राटीकरण करुन मागासवर्गीयांचे शिक्षण व नोकरीतील हिस्सेदारी का संपविली जात आहे? ओबीसी, मराठा, धनगर आदिवासींचे भांडणे लावून त्यांच्या हक्काविरुद्ध कोर्टात जाणारे कोर आहेत. शेतकऱ्यांचा स्वामीनाथन आयोग का लागू होत नाही. ओबीसी समाजाचा नोकरीतील अनुशेष का भरला जात नाही, ईडब्ल्यूएसचे असंवैधानिक आरक्षण देताना सवर्णांना २० लाखाची उत्पन्न अट व त्यांच्यापेक्षा मागास असलेल्या ओबीसींना ८ लाखाची अट का, हा भेदभाव कोण करते? आदी प्रश्नांचा मागोवा घेत वक्त्यांनी लक्षात आणून दिले की कोणतीही सरकार आली तरी ओबीसींना त्यांच्या संख्येप्रमाणात भागिदारी मिळत नाही कारण वर्णवादी व्यवस्था राबवणारे उच्चवर्णीय हिंदूच्या हातात सत्ता असल्यामुळे ते ओबीसींना सत्ता-संपत्ती, शिक्षण-नोकरीत संख्येप्रमाणात भागीदारी द्यायला तयार नाहीत. तेव्हा ओबीसी हिंदूनी सवर्ण हिंदूच्या संघटनातील नेतृत्व झुगारुन स्वत: चे सामाजिक, धार्मिक, राजकीय संघटन मजबूत करुन स्वत: ची धर्म, अर्थ राज्यसत्ता निर्माण करण्यासाठी कार्य करावे.



त्याशिवाय ओबीसी समाजाचे प्रश्न सुटणार नाही. मनुवादी राजकीय पक्षांच्या गाजर यात्रेला वा फेकंफेकीला भूलथापांना बळी न पडता मत मागायला येणाऱ्या नेत्यांचा ओबीसी प्रश्नांवर घेराव करा. त्याशिवाय समाजाशी धोकाधडी करणारे वर्णवादी पक्षांचे नेते वठणीवर येणार नाही. असा इशारा वक्त्यांनी दिला. प्रास्ताविक मोहाडीचे सरपंच नरेंद्र चौरागडे यांनी मांडले. संचालन वाय.एफ.पटले यांनी केले. आभार जे.के. पटले यांनी मानले.



# लाल बावटा शेतमजूर युनियनच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांची निवड

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य लाल बावटा शेतमजूर युनियनचे महाराष्ट्र राज्यचे १४ वे राज्य अधिवेशन औरंगाबाद मराठा मंदिर येथे ७ व ८ ऑक्टोबर रोजी पार पडले. ज्यामध्ये राज्यभरातून २०० प्रतिनिधींनी या अधिवेशनात हजेरी लावली. यावेळी गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील तीन पदाधिकाऱ्यांची राज्यपातळीच्या पदाधिकाऱ्यांमध्ये तीन वर्षासाठी निवड करण्यात आली.

अधिवेशनात राष्ट्रीय महासचिव गुलजारसिंग गोरिया पंजाब, डॉ. भालचंद्र कानगो यांच्यासह इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. दरम्यान शेतमजूर कामगार यांच्या मागण्यांबाबद ठराव मंजूर करण्यात आले. प्रसंगी राज्यातील ४१ पदाधिकारींसह कार्यकारिणीची निवड करण्यात आली. ज्यामध्ये अध्यक्षपदी नामदेव चव्हाण बीड, उपाध्यक्ष हौसलाल रहांगडाले गोंदिया, संजय मढवधरे अमरावती, ईश्वर पाटिल नंदुरबार, सरचिटणीस शिवकुमार गणवीर भंडारा, सहचिटणीस गणेश कस्बे, विजय बचाटे सांगली, कल्पना डोंगरे गोंदिया यांची निवड करण्यात आली. विशेष म्हणजे शिवकुमार गणवीर व हौसलाल रहांगडाले यांची फेरनिवड करण्यात आली.

# दुग्ध व्यवसायातून होणार महिलांची आर्थिक उन्नती-जिल्हाधिकारी डॉ.चिन्मय गोतमारे

**गोंदिया:** अदानी फाउंडेशन तिरोडा, जिल्हा प्रशासन, महिला आर्थिक विकास महामंडळ व फार्मर प्रोडूसर कंपनीच्या संयुक्त माध्यमातून नव तेजस्विनी दुग्ध शीतकरण कार्यक्रमांतर्गत तिरोडा तालुक्यातील ग्राम सेजगाव येथे २० गावातील २० महिला बचत गटांना जिल्हाधिकारी डॉ.चिन्मय गोतमारे यांच्या हस्ते दूध संकलन केंद्र साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रामुख्याने माविमचे जिल्हा समन्वयक संजय संगेकर, अदानी फाऊंडेशनचे प्रमुख बिमुल पटेल, तिरोडा क्षेत्राचे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य व सेजगाव ग्रामपंचायतचे सरपंच उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी गोतमारे यांनी दुग्ध व्यवसायातून आपल्या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिला आर्थिक सक्षम होतील तसेच त्यांच्या व्यावहारिक ज्ञानात सुद्धा भर पडेल. सोबतच कुटुंबाच्या उदरनिर्वाह मध्ये सुद्धा त्यांचा हातभार लागणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय संगेकर यांनी केले व कार्यक्रमाविषयी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला आर्थिक विकास महामंडळ गोंदिया, अदानी फाउंडेशन तिरोडाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन सारिका बनसोडे तर आभार प्रदर्शन अनिता आदमने यांनी मानले.



# प्रफुल्ल पटेलच्या गृह जिल्ह्यात राष्ट्रवादीला खिंडार

## युवक राष्ट्रवादीच्या तालुका अध्यक्षांसह ३०० कार्यकर्ते काँग्रेसमध्ये



**गोंदिया :** राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्यकारी अध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल यांच्या गृहजिल्ह्यात म्हणजेच गोंदियात राष्ट्रवादीला मोठे खिंडार पडले आहे. युवक राष्ट्रवादीच्या तालुका अध्यक्षांसह सुमारे ३०९ कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. राज्यात राष्ट्रवादीतील फुटीनंतर हे सर्व कार्यकर्ते प्रफुल्ल पटेल यांच्यासोबतच होते. मात्र सध्या राज्यातील वरिष्ठ पातळीवरील भाजप-राष्ट्रवादीच्या मैत्री मुळे स्थानिक भाजपच्या कार्यकर्त्यांकडून त्रास होत असल्याचा आरोप करत या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसचा हात पकडलाय.

भाजपकडून होत असलेला त्रास आणि खासगीकरणाचा सपाटा, यामुळे नाराज झालेल्या कार्यकर्त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यामुळे गोंदियात राष्ट्वादीला मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादीसह महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष राहुल हटवार यांनी १०० कार्यकर्त्यांसह तसेच भाजपच्या सुमारे १०० कार्यकर्त्यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशानंतर देवरी आमगाव विधानसभा क्षेत्रात काँग्रेसला बळ मिळाले असून राष्ट्रवादी, भाजप व मनसेला मोठा धक्का बसला आहे.

# अर्जुनी मोर. येथे पोलीस पाटील पदासाठी १५ ऑक्टोबरला लेखी परिक्षा

**अर्जुनी मोरगाव:** - उपविभागीय कार्यालय अर्जुनी मोरगाव अंतर्गत सडक अर्जुनीच्या २७ तर अर्जुनी मोरगाव तालुक्यातील ६८ पोलीस पाटील पदाकरिता ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते त्यानुसार दोन्ही टप्प्यात ११०६ अर्ज प्राप्त झाले विभागाच्या वतीने ऑनलाइन अर्जाची पडताळणी नंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर झाली त्यात १०५९ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले असून ४७ उमेदवारांना अपात्र करण्यात आले आहे. दि. १५ ऑक्टोंबर रोजी स्थानिक अर्जुनी मोरगाव येथे दोन केंद्रावर ही लेखी परीक्षा घेण्यात येणार असून दि. ९ ते १५ ऑक्टोंबर दरम्यान परिक्षार्थी उमेदवारांना प्रवेशपत्र ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत. अशी माहिती उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांनी दिली.

२१ ऑगस्ट रोजी २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येला अधिकृत धरून पोलिस पाटील पदाचे आरक्षण सोडत घेण्यात आली. जागा निश्चित करुन ८ सप्टेंबर ते २० सप्टेंबर या कालावधीत उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले. त्यानुसार आलेल्या अर्जाची विभागाच्या वतीने पडताळणी केली त्यात ९४३ अर्ज पात्र , तर ७२ अर्ज त्रुट्या व पुराव्या अभावी प्रलंबित ठेवण्यात आले आणि ४३ उमेदवारांचे अर्ज अपात्र करण्यात आले होते.

यावेळी अनेक उमेदवारांनी आक्षेप घेतला त्या आक्षेपांची तलाठी तथा ग्रामसेवक यांच्या स्थानिक पंचनाम्या आणि अहवालावरुन शहानिशा करुन घेतल्यानंतर बहुतेक प्रलंबित आणि अपात्र ठरलेले उमेदवार पात्र ठरले होते. तर काही अर्जांवर गावकऱ्यांनी आक्षेप घेतला असे अर्जही अपात्र करण्यात आले आहेत. मात्र निघालेल्या आरक्षणानुसार त्या १३ गावातून एकही अर्ज न आल्यामुळे तर १ गावामध्ये आलेल्या अर्जातील दोन्ही उमेदवार सबळ पुराव्या अभावी अपात्र ठरल्याने त्या एकूण १४ गावांकरिता शासन निर्णयानुसार नव्याने आरक्षणाची अदलाबदल करुन अर्ज मागविण्यात आले. त्यात नवीन १६३ उमेदवारांची भर पडली दोन्ही टप्यात आलेल्या ११०६ अर्जापैकी ४७ अर्ज अपात्र ठरविण्यात आले आणि अखेर ९४ पोलीस पाटील पदांच्या जागे करिता १०५९ उमेदवार पात्र ठरले उमेदवारांना प्रवेशपत्र विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध होणार असून १५ ऑक्टोंबर रोजी दुपारी १.३० ते ३ या वेळेत अर्जुनी मोरगाव येथील सरस्वती विद्यालय तथा शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालयात अशा दोन केंद्रावर लेखी परीक्षा निश्चित करण्यात आलेली आहे. लेखी परीक्षा ही ८० गुणांची असून प्रत्येक प्रश्नाला १ गुण असेल. त्यांनंतर ४५ टक्के गुण घेणाऱ्या उमेदवारांना मुलाखती करिता बोलविण्यात येईल मुलाखत ही २० गुणांची असणार आहे.





**पोलिस पाटील पदांची परीक्षा अतिशय पारदर्शक पार पडणार आहे. उमेदवारांनी प्रवेशपत्रात दिलेल्या अटी आणि शती वाचून त्याचे काटेकोर पालन करून ,विहित वेळेत परीक्षा केंद्रावर पोहचावे, संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन असल्यामुळे उमेदवारांचा बराच वेळ वाचला आहे.**

**वरुणकुमार शहारे उपविभागीय अधिकारी अर्जुनी मोरगाव**

### बाम्हणी खडकी येथे तात्पुरती स्थगित

**सडक अर्जुनी तालुक्यातील बाम्हणी खडकी येथे निघालेल्या आरक्षणानुसार सदर जागा विमुक्त जाती (अ) करिता राखीव ठेवण्यात आली होती. या ठिकाणावरुन दोन उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. या अर्जावर गावकऱ्यांनी आक्षेप घेतल्यानंतर हे दोन्ही अर्जाच्या पुराव्यांची उपविभागीय कार्यालयाच्या वतीने पडताळणी केल्यानंतर दोन्ही अर्जदारांचे पुरावे अपुरे आढळून आले. पात्र झालेल्या दोन्ही उमेदवारांना सखोल चौकशीअंती अपात्र ठरविण्यात आले त्यामुळे या जागेची परीक्षा तात्पुरती स्थगित करण्यात आली त्यामुळे आता ९४ जागांकरिता १०५९ उमेदवारांमध्ये लेखी परीक्षा पार पडणार आहे.**

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभेत विविध विषयांवर करण्यात आली चर्चा



**तिरोडा:** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा समितीच्या मार्केट यार्डमध्ये पार पडली. सभेत बाजार समितीशी निगडीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

सभापती जितेंद्र रहांगडाले यांच्या अध्यक्षतेत आयोजित सभेला उपसभापती भुमेश्वर रहांगडाले व सर्व संचालक उपस्थित होते. प्रभारी सचिव कार्तिक बिसेन यांनी बाजार समिती संबंधात संपूर्ण माहिती मांडली. दरम्यान, समितीशी निगडीत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. प्रास्ताविक सभापती जितेंद्र रहांगडाले यांनी मांडले. आभार उपसभापती भुमेश्वर रहांगडाले यांनी मानले. याप्रसंगी समिती संचालक ओमप्रकाश पटले, रामसागर धावडे, रमेश टेंभरे, अनिल भगत, डॉ. गोवर्धन चव्हाण, जयप्रकाश गौतम, घनश्याम पारधी, मदनलाल पटले, मिलींद कुंभरे, रवींद्र वहिले, दुर्गाप्रसाद कोठे, भूषण झरारीया, शरद अग्रवाल, मनीषा पटले, प्रतिमा जैतवार, ललीता नागरीकर उपस्थित होते. सभेसाठी समिती कर्मचारी चंद्रकात चव्हाण, कुलदीप शुक्ला, राधेश्याम मडावी, राजकुमार उके, अशोक रहांगडाले, अशोक पटले, पुरुषोत्तम बघेले, कैलाश कटरे, दिनेश चौबे, विणू रहांगडाले, जगदीश शेंद्रे, ज्ञानदास बागडे, मनीषा दागमवार, अनिता नंदेश्वर यांनी सहकार्य केले.

### माजी पदाधिकारी व सदस्यांचा सत्कार

याप्रसंगी समितीचे माजी सभापती, उपसभापती, प्रशासन व माजी संचालक देऊ बघेले, राजकुमार केशरवानी, डॉ. अविनाश जायस्वाल, हेमराज अंबुले, योगेंद्र कटरे, गणराज रहांगडाले, चुन्नीलाल पटले, शोभेलाल दहीकर, गजानन बारापात्रे, तेजराम टेंभरे, रतन कुशराम, संजयसिंह बैस, डॉ. बसंत भगत, विजय डिंकवार, डी.आर. नवघरे, राधेश्याम नागपुरे, संजय कोठे, दिनेश चोभरे, दीपक पटले व कमलेश मलेवार यांचा सत्कार करण्यात आला.